**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१५/२००४ मधील नि.क्र.१६८ आणि नि.क्र. १७० वरील संयुक्त आदेश</u>**

१. नि.क्र.१६८ चा अर्ज, नि.क्र.१७० चा अर्ज आणि त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

२. प्रतिवादी क्र.३ बळवंतसिंग परदेशी स्वत: उपस्थित असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी स्वत: दोन्ही अर्ज दिलेले आहेत. कारण प्रतिवादी क्र.१० ते १७ यांनी दावा मिळकतीसंबंधी स्वतंत्र मागणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रतिवादीला दाव्यामध्ये प्रतिवाद करता येत नाही आणि तिस-या पक्षाने दाव्यात त्यांच्या स्वतंत्र मागणीची नोंद करावी. त्याची दुरुस्त प्रत या प्रतिवादीला मिळावी आणि तोपर्यंत दाव्याचे कामकाज बंद ठेवण्यात यावे. सदर प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे विधीज्ञ श्री. पी.बी. क्षीरसागर असून त्यांनी अशा प्रकारच्या अर्जांवर सही करणार नसल्याचे सांगितले, म्हणून त्यांनी स्वत: हे अर्ज दिलेले आहेत.

३. प्रतिवादी क्र.१० ते १९ यांचे या अर्जांवर म्हणणे असे की, सदर प्रतिवादी या प्रकरणी हजर झाल्यानंतर प्रतिवादींनी नि.क्र.१५४ आणि नि.क्र.१५६ प्रमाणे प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्यावर मूळ वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी कैफीयत दिलेली आहे. त्यानंतर न्यायालयाने अतिरिक्त मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यानुसार वादींनी अतिरिक्त पुरावा दिलेला आहे आणि आता मूळ प्रतिवादींनी पुरावा देण्याकामी दावा नेमलेला आहे. अर्ज निरर्थक आहे, त्यामुळे रद्द व्हावा.

४. मी प्रतिपक्षाच्या वतीने ॲड. एम.आर. फडणीस यांचा युक्तीवाद ऐकला.

५. सर्वात महत्वाची बाब अशी की, सदर पक्षकार प्रतिवादी क्र.३ यांनी या कामी विधीज्ञांची नेमणूक केलेली आहे. प्रस्तुत दोन्ही अर्जांवर सदर विधीज्ञांच्या सहया नाहीत आणि

हे प्रकरण स्वत: चालविण्यासाठी सदर पक्षकाराने न्यायालयाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.

६. दाव्याची सदयस्थिती विचारात घेता, प्रतिवादींनी पुरावा देण्याकामी दावा नेमलेला आहे. प्रतिवादी क्र.१० ते १९ या प्रकरणी हजर झाल्यानंतर अतिरिक्त मुद्दे निश्चित झालेले आहेत आणि वादीचा अतिरिक्त पुरावा देखील संपलेला आहे.

७. प्रतिवादी क्र.१० ते १७ यांनी न्यायालयाकडे काय मागणी करावी हा सर्वस्वी त्यांचा प्रश्न आहे. सदर प्रतिवादी क्र.३ च्या अर्जावरुन इतर पक्षकारांनी काय मागण्या कराव्यात याबाबत निर्देश न्यायालयाने देण्याची कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. प्रस्तुत अर्ज केवळ प्रकरण लांबविण्याच्या दृष्टीने करण्यात आल्याचे दिसते. अशा स्वरुपात दाखल झालेले दोन्ही अर्ज मुळातच चालू शकत नाहीत. ते कोणत्याही कायदेशीर तरतुदींशिवाय आहेत. त्यामुळे, पुढील आदेश.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नि.क्र.१६८ आणि नि.क्र.१७० दप्तरी दाखल करण्यात येतात.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

सही/-
(वर्षा बा. पारगांवकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक : ०४/०३/२०१६.